॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

जा.क्र.कबचौउमवि/२/पुरस्कार-२०२५/७६/२०२६ दि. २०.०४.२०२६

प्रति,
१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य / मान्यता प्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक.
२. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक व प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख / नियंत्रक अधिकारी .
३. विद्यापीठ उपकेंद्रांचे मा. मानद संचालक / विभागप्रमुख (अमळनेर, धुळे व नंदुरबार).

**विषय :-** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था, प्राचार्य / संचालक, तसेच विद्यापीठ आस्थापनेवरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कारासाठी प्रस्ताव / नामनिर्देशनासाठी मुदत वाढ देण्याबाबत.....

**संदर्भ :-** विद्यापीठाचे पत्र जा.क्र. कबचौउमवि/२/पुरस्कार-२०२५/६७/२०२६ दि. ३०.०३.२०२६

**महोदय / महोदया,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था, प्राचार्य / संचालक, शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी कर्मचारी तसेच विद्यापीठ आस्थापनेवरील शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी वरील संदर्भीय पत्रान्वये दि. २० एप्रिल, २०२६ पर्यंत पुरस्कार मागविण्यात आले होते. परंतु संबंधित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था इ. यांच्याकडून प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत मौखिकरित्या विनंती करण्यात येत होती. सदर बाब विचारात घेऊन विषयांकित पुरस्कारांसाठी प्रस्ताव / नामनिर्देशन सादर करण्यास **दि. २७ एप्रिल, २०२६ पर्यंत** मुदतवाढ देण्यात येत आहे.

**विद्यापीठाचे पत्र जा.क्र. कबचौउमवि/२/पुरस्कार-२०२५/६७/२०२६ दि. ३०.०३.२०२६ रोजीच्या पत्रकातील संभ्रम दूर होण्याच्या दृष्टीने खालील सविस्तर दुरूस्त्यांव्यतिरिक्त नियमावलीत व प्रपत्रांमध्ये कोणत्याही दुरस्त्या नाहीत. याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

**सन २०२५ साठी** उत्कृष्ट शिक्षक, उत्कृष्ट शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी तसेच व्यावसायिक व अव्यावसायिक महाविद्यालयातून उत्कृष्ट महाविद्यालय / परिसंस्था, उत्कृष्ट प्राचार्य / संचालक पुरस्कार, विद्यापीठ प्रशाळांमधून आदर्श प्रशाळा, केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प (CAP) (२०२५-२६) यशस्वीरित्या राबविणाऱ्या महाविद्यालयांना पुरस्कार, तसेच महाविद्यालये / विद्यापीठ प्रशाळांतर्गत अध्यापकांमधून **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता 'संशोधन पुरस्कार'** (Research award): Research Excellence Award - *Funding* (for College & University Teachers), Research Excellence Award-*Publication* (for College & University Teachers) व Research Excellence Award-*Patent* (for College & University Teachers) यासाठी मला प्राप्त आदेशान्वये वरील सर्व पुरस्कारांसाठी सदर योजनेच्या अनुषंगाने **तीन प्रतींमध्ये** स्वतंत्रपणे नामनिर्देशन / अर्जांचे प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

उपरोक्त अनुषंगाने आपणाकडे प्राप्त होणारे प्रस्ताव / नामनिर्देशन विहित नमुन्यात आपल्या शिफारसीसह **दि. २७ एप्रिल, २०२६ पर्यंत** विद्यापीठ कार्यालयात प्राप्त होतील, अशा बेताने सादर करावेत. (प्रस्ताव / अर्जासोबत पुरावा दाखल आवश्यक तेथे पत्रांच्या सत्यप्रती जोडाव्यात). विहित मुदतीत, कार्यालयीन वेळेत प्राप्त न होणारे नामनिर्देशन / अर्जांचे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत व कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. विनोद प्र.पाटील)
**कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी :**
१.मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.२.मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि., जळगाव.३. उपकुलसचिव, प्रशासन विभाग, कबचौउमवि., जळगाव. ४.स्थळप्रत.

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत, दुरध्वनी क्र : ०२५७ - २२५७२५०, २२५७२४७
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257 - 2257250, 2257247
Email : registrar@nmu.ac.in Web : www.nmu.ac.in